
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# राष्ट्रवादी इतिहासलेखन : जागतिक

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विद्यार्थी, सामाजिक शास्त्रे प्रशाळा विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

## १. प्रस्तावना :-




राष्ट्रवादाची उत्पत्ती युरोपात झाली. मॅग्नाचार्टा तसेच नेपोलियन बोनापार्टची नागरी हक्काची सनद आणि फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेली समता, स्वतंत्रता, बंधुता ही महत्त्वाची तत्त्वे जागतिक राष्ट्रवादाला कारणीभूत ठरली. लोकशाहीची मुळे प्राचीन ग्रीकांपर्यंत जातात पण त्याचा विकास हा राष्ट्रवादातून घडुन आला. ग्रीक, रोमन सत्तेबरोबर १५ व्या शतकात कॉन्स्टॅन्टीनोपलचा पाडाव अरबांनी केला आणि ते पश्चिमेत घुसले आणि युरोपीय राष्ट्रवादाला मोठी ठिणगी पेटली.

मार्टीन ल्युथरने धर्मसुधारणा घडवुन आणली आणि एक हजार वर्षांपासून युरोपचा सामन्य माणुस जो धर्मसत्ता आणि राज्यसत्ता यात पिळला जात होता, त्याची सुटका झाली. वैज्ञानिक क्रांतीने तर युरोपाला सर्वात उंचीवर नेले. आयझॅक न्युटन, कोपर्निकस, गॅलिलिओ, फ्रान्सिस बेकन आणि अल्बर्ट आईन्स्टाईन यांनी वैज्ञानिक प्रगती घडवून आणली. हा राष्ट्रवाद म्हणजे काय, या राष्ट्रवादाची उत्पतती कशी झाली, त्याचे परिणाम आणि राष्ट्रवाद आणि माणुस यांचा उहापोह करुन एक भाषा, जात, समाज, राष्ट्रगीत, प्रदेश याच्याखाली येऊन हा राष्ट्रवाद कसा प्रगती पावला. पुढे जेकोबीन क्लबने युरोपात राष्ट्रवादाचा प्रवाह अनेक राष्ट्रांना कसा पुरविला. नेपोलियन कोडने सामान्य नागरीकांना थोड्या काळापुरती का नाही स्वातंत्र्याची जाणीव करवुन दिली. या राष्ट्रवादाचा एकंदरीत इतिहास पुढीलप्रमाणे :

## राष्ट्रवाद म्हणजे काय ? :-

राष्ट्रवाद म्हणजे काय हे समजण्यासाठी आपल्याला प्रसिध्द व्यक्तींची राष्ट्रवादाबद्दलची वेगवेगळी मते ग्राह्य धरावी लागतात. राष्ट्रवादाची उत्पत्ती ही मानवाच्या अंत:करणात होत असते आणि तिचा उद्रेक माणसाच्या विचाराद्वारे आणि त्याने राष्ट्राच्या प्रगतीसाठी केलेल्या कृत्यावर आधारलेला असतो. अल्बर्ट आईन्स्टाईन म्हणतात, "Nationalism is an infantile thing, It is the measles of mankind."[१] राष्ट्रवाद ही मानवजातीच्या कल्याणासाठी नेहमी कारणीभुत ठरते. मानवाने ज्यावेळेस आपल्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला, तेव्हा ती राष्ट्रवादाची भावना जागृत झाली आणि तिचा परिणाम अनेक क्रांत्या घेऊन आल्या. उदा. फ्रेंच, रशियन, आफ्रिकेतील चळवळी. रविंद्रनाथ टागोर म्हणतात, "Clever lies become matters of self congratulation, solemn pledges become a force, laughable for their very solemnly. The nation with all its perphernative of power and prosperity. Its flags and pious rhymns. Its blasphemous prayers in the churches and the literary mouk thunders of its patriotic braying cannot hide the fact that the nation is the greatest evil for the Nation that all its precautions are against it and new birth of its fellow in the world is always followed in its mind by the dread of new peril."[२] रविंद्रनाथ टागोर राष्ट्रवादाला अनेक पैलुंची जोड देतात, ते जात, धर्म, वंश, प्रदेश यांच्यापलीकडे राष्ट्रवादाची भावना घेऊन जातात, भारताने जात, धर्म, वंश, प्रदेश या गोष्टी राष्ट्रवादाला जशा कारणीभूत ठरल्या तशाच त्या जागतिक राष्ट्रवादाला देखील कारणीभूत ठरतात. राष्ट्रवादाचे महत्त्व विशद करतांना एच.जि.व्हेल लिहीतात, "Out true Nationality is mankind."[३] आमचे खरे राष्ट्रीयत्त्व मानवजाती आहे आणि म्हणुन लोकशाही तिचा मुख्य स्तंभ बनला आहे. राष्ट्रवादाशिवाय लोकशाहीची निर्मिती होऊ शकत नाही आणि त्यासाठी सामान्य माणसाची गरज असते. जॉर्ज ओवेन, राष्ट्रवादाकडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघतात, ते म्हणतात "Nationalism is power hunger tempered by seld deception."[४]

राष्ट्रवाद म्हणजे स्वतःची फसवणूक करुन उधडलेली शक्तीची भुमिका ही शक्तीची भुमिका ओवेल जहालवादी भुमिकेतुन मांडतांना दिसतात. जिओफ मुलन लिहीतात, "All of nationalism can be understood as a kind of collective narissism"[५] सर्व राष्ट्रवाद हा सामुहिक गरजेवर घडवुन आणतो आणि एका नव्या इतिहासाला जन्म देतो. हा जन्म एका नव्या राष्ट्राला प्रज्ज्वलित करुन त्याला एका छत्राखाली ठेवतो, २० वे शतक राष्ट्रवादाचे मोठे उदाहरण आहे.

२० या शतकात राष्ट्रवाद हा सामान्य माणसाचा स्व अधिकार झालेला आहे. आता त्याची आर्थिक, सांस्कृतिक पिळवणुक कोणत्याही स्तरावर होऊ शकत नाही. कारण त्याची राष्ट्रवादाची प्रवृत्ती आता आपल्या हक्काच्या जाणीवेसाठी आणि राष्ट्रासाठी जागृत असते.

## ३. राष्ट्रवादाचा अतिरेक आणि मानवी प्रेरणा :-

राष्ट्रवादाला अमेरिकी राष्ट्रवाद म्हणावा का ? अनेक विचारवंतांनी या राष्ट्रवादाला नरसंहारास कारणीभुत मानलेले आहे. जे कृष्णमुर्ती लिहीतात, "राष्ट्रवादातुन निर्माण होणाऱ्या निरर्थकतेवर हिप्पी चळवळीनेही फार जोरदार आक्षेप घेतला होता. हिप्पी हे राष्ट्रवाद आणि युध्दाच्या विरोधात होते. अमेरिका आक्रमक राष्ट्रवादाचे उत्तम प्रतिकच आहे. १९६५ नंतर अमेरिकेने व्हिएतनाम विरोधात सुरु केलेले युध्द अधिकाधिक उग्र होत गेले. यामध्ये गनिमी काव्याने लढुन अमेरिकी सैनिकांना चांगलेच जेरीस आणले होते... अनेक कारणांसाठी अमेरिकन तरुण वर्गाला युध्दविरोध प्रचंड वाटला. अमेरिकन तरुणांनी युध्दासाठी ड्राफ्ट कार्डसची जाहीर होळी करण्याचा कार्यक्रम सुरु केला."[६] अमेरिकेत राष्ट्रवादाच्या नावावर चालणाऱ्या युध्दाला तेथे त्याच तरुणवर्गाने कडाडुन विरोध केला. राष्ट्रवादाच्या नावावर अनेक लोकांचा बळी जातो. ही बळी घेणारी मंडळी राजकीय वर्तुळात राहुन राष्ट्रप्रवृत्तीला चालना देते पण कशासाठी लोकांचा बळी घेण्यासाठी. जात, वंश, धर्म, प्रदेश यांच्या नावावर राष्ट्रप्रवृत्ती जागी करुन मग नरसंहार घडवुन आणणे हे आजचे आधुनिक चित्र आहे आणि अनेक लोक अध्यात्मिक राष्ट्रवादाच्या जोरावर स्वतःची आहुती देतात, हा खरा राष्ट्रवाद नाही. राष्ट्रवाद हा राष्ट्राची सर्व साधनसंपत्तीची समान वाटणी करुन सर्व मनुष्यजातीला समानतेची वागणुक देईल, तो खरा राष्ट्रवाद. "ब्रिटीश हे उत्तम प्रशासक होते. त्यांनी भारतात मोठ्या प्रमाणावर सुधारणा देखील घडवुन आणल्या. सेवा सुविधेचे जाळे विस्तारीत केले. तरीदेखील आम्हाला त्यांच्यापासून स्वामित्त्व का हवे होते ? तर आम्हाला आचार-विचारांचे स्वातंत्र्य हवे होते. या स्वातंत्र्याने आम्ही एक कल्याणकारी राष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले होते. असे असमानतेपासुन भारतीय समाज मुक्त होऊन आम्ही एक आदर्श राष्ट्र बनवु... अशी स्वप्ने होती. ज्यासाठी शंभर वर्षे संघर्ष केला होता. परंतु स्वातंत्र्याच्या सत्तरीनंतरदेखील देशाच्या हुतात्म्यांचे स्वप्न साकार झाले काय ? वास्तवात हा देश अत्यल्प व असमानतेपासुन स्वतंत्र झाला काय ? आणि खरंच हे राष्ट्र कल्याणकारी राष्ट्र झाले काय ? तर याचे उत्तर संदिग्ध आहे."[७] खूपच मोठा प्रश्न हा भारताने शंभर वर्षे एवढा मोठा संघर्ष का केला ? हे स्वतंत्र विचारांचे होते. एकसंघ राहण्याचे होते. आम्ही सर्व जात, धर्म, वंश, प्रदेश एकत्र राहु आम्हाला स्वतंत्र द्या. या सर्व घटकांनी स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले. राष्ट्रवाद या स्वातंत्र्याला कारणीभुत ठरला. मग का राष्ट्र दोन भागात तुटले, उत्तर आहे अध्यात्मिक राष्ट्रवादाचा हा अतिरेक होता.

राष्ट्रवादाची भावना प्रत्येक मनुष्यात आहे. पण हा राष्ट्रवाद कोण चालवितो, त्याचा उपयोग कशासाठी होतो. मी एक राष्ट्रवादी मनुष्य म्हणुन स्वतःला प्रश्न विचारायला हवे.

## ४. राष्ट्रवादाचे प्रकार :-

जागतिक राष्ट्रवादात अनेक बदल आज घडुन आलेले आहे. पण कोणत्याही क्रांती-प्रतिक्रांतीत एक नवीन विचारसरणी आणि कृती असते. देश, प्रदेश, जात, धर्म, वंश ह्या वेगवेगळ्या असतात. काळानुसार या राष्ट्रवादात बदल होत असतो. प्राचीन काळी अनेक साम्राज्ये होती. प्रत्येक साम्राज्याचा वेगवेगळा राष्ट्रवाद होता. हा राष्ट्रवाद त्यावेळी धर्मावर आधारलेला होता. म्हणुन युरोपात आठ धर्मयुध्दे (क्रुसेड) घडुन आली.

१) **जातीय राष्ट्रवाद :** प्राचीन काळापासुन विशिष्ट लोकांनी राष्ट्राच्या साधनसंपत्तीवर आपली मक्तेदारी प्रस्थापित केल्यामुळे एकसंघ राष्ट्रवादाला मोठा आघात पोहोचला. जातीय राष्ट्रवाद हा स्थानिक राष्ट्रवाद आहे. ज्या लोकांना आपल्या हक्कासाठी लढावे लागते. त्यांचा हा राष्ट्रवाद आहे. उच्चवर्णीयांचा राष्ट्रवाद हा संघर्षमय नाही तर तो वंशपरंपरेने त्यांना मिळालेला आहे. सर्वात प्रथम गॉटफिड जोहान आणि वॉन हेरडर यांनी जातीय राष्ट्रवादाची संकल्पना मांडली आणि ethnonotionalism चा उदय झाला.

२) **नागरी राष्ट्रवाद :** नागरी राष्ट्रवाद हा लोकांचा इच्छेचा विचार करुन त्यांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे होय. रुसो यांनी आपल्या सामुहिक इच्छा या सिध्दांतात याचा उहापोह केलेला आहे आणि बुध्दीवादी वर्गाला आणि उदारमतवादी लोकांना नागरी राष्ट्रवादाच्या माध्यमातून राष्ट्राचा कारभार सोपविते.

३) **सांस्कृतिक राष्ट्रवाद :** सांस्कृतिक राष्ट्रवाद हा राष्टाचा, त्याचा धर्म, भाषा, वंश, समाज, प्रदेश यांना एकसंघ समाजाच्या प्रवृत्तीने ओळखतो. आज जगात वेगवेगळ्या प्रकारचे वंशज आहे. पण राष्ट्रवाद हा त्या-त्या राष्ट्रांना आपल्या याच सांस्कृतिक मुल्यातुन जपुन ठेवतो.

४) **अतिरेकी राष्ट्रवाद :** या जगाला मुसोलिनी, हिटलर यांचा अतिरेकी राष्ट्रवादाचा क्रांतीकारी राष्ट्रवादाला सामोरे जावे लागले. ज्याचा परिणाम होलोकॉस्ट, दुसऱ्या महायुध्दाचे परिणाम यांच्यात झाला. राष्ट्राच्या हितासाठी वाटणारा हा राष्ट्रवाद राष्ट्राच्या नाशास कारणीभूत ठरतो.

५) **अध्यात्मिक राष्ट्रवाद :** धर्माच्या नावावर आज काय होत नाही, युरोपात धर्मसत्ता आणि राज्यसत्ता यांच्यात चाललेला एक हजार वर्षांचा काळ अंध:कारमय म्हणुन ओळखला गेला. त्याचा परीपाक आठ क्रुसेड जी मुस्लिम-ख्रिश्चनांमध्ये लढली गेली त्यांच्यात झाला. अध्यात्मिक कट्टरवादामुळे आज जगाला दहशतवादाचा सामना करावा लागत आहे, इस्त्राएल या ज्यु राष्ट्राची निर्मिती झाली आणि आजपर्यंत इस्लाम ज्यु याचा संघर्ष सुरुच आहे.

६) **ज्यु लोकांचा एकसंघ राष्ट्रवाद :** जागतिक स्तरावर एकमेव राष्ट्र इस्त्राएल या ज्यु राष्ट्राची निर्मिती आपल्या धर्माच्या एकसंघ राष्ट्रवादावर झाली. पंधराशे वर्षापासून भटकत असलेले ज्यु ज्यांच्या हिटलरने होलोकास्टमार्फत ६० लाख ज्युंची आहुती दिली होती. त्या ज्युंनी आपला राष्ट्रवाद कधी विझु दिला नाही आणि एका प्रभावशाली राष्ट्रात त्याची परिणीती झाली.

अशा प्रकारे राष्ट्रवाद आणि त्याचे प्रकार आपण समजु शकतो. तसेच आर्थिक राष्ट्रवाद हा देखील आज आधुनिक काळात महत्त्वपूर्ण भुमिका बजावत आहे. आर्थिक राष्ट्रवादाच्या जोरावर आज अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, रशिया ही राष्ट्रे जागतिक स्तरावर आपला सर्वोच्च मंच उभा करुन वसलेली आहे.

## ५. राष्ट्रवाद शब्द आणि राष्ट्रवादाची व्याख्या :-

१) **अर्नेस्ट रेनन :** अर्नेस्ट रेनन यांनी सोरबन विद्यापीठात आपल्या भाषणात राष्ट्रवाद म्हणजे काय याची व्याख्या केली, ते म्हणतात, "A Nation is the culmination of a long past of endeavours, sacrifice and devotion"[९] एका राष्ट्रची निर्मिती अनेक संघर्षातून आणि त्यागातून होते. या राष्ट्रनिर्मितीत अनेक लोकांची आहुती बरोबरच राष्ट्राच्या प्रगतीसाठी ज्या विचारांची गरज असते, त्या विचारांच्या मुळावर ते राष्ट्र उभे राहते.

२) **राष्ट्रवाद शब्दाची उत्पत्ती :** लॅटीन शब्द Nesho पासुन राष्ट्रवाद या शब्दाची उत्पत्ती झाली. Nesho म्हणजे Nation (राष्ट्र) एम. जिर्मन Nationality म्हणजे काय याचा उहापोह करतात, ते लिहीतात की, "राष्ट्रीयता एका विशिष्ट देशाबद्दल असलेली तीव्रता, प्रेम, लगाव, सामान्य भावना, भाषा, धर्म आणि समुह याचे संयुक्त रुप म्हणजे तुम्हची राष्ट्रीयता होय."[१०]

## ६. फ्रेंच राज्यक्रांतीने राष्ट्रवादाची सुरुवात :-

प्राचीन काळापासून अनेक क्रांत्या-प्रतिक्रांत्या होत आलेल्या आहेत. पण खरा राष्ट्रवाद जो सामान्य माणसात उफाळुन आला तो फ्रेंच राज्यक्रांतीने. या क्रांतीने संपूर्ण युरोप राष्ट्रवादी प्रवृत्तीने ढवळून निघाले. १७८९ ला राजेशाही संपुर्ण नष्ट झाली आणि सामान्य लोकांना स्वातंत्र्याची पूर्ण जाणीव झाली. सामंतशाही / प्रभुसत्ता आता नष्ट झाली.

## ७. जेकोबिन क्लब :-

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे युरोपातील तरुण वर्गाने जेकोबिन क्लब स्थापन केला आणि संपूर्ण युरोपात राष्ट्रवादाचा प्रचार करु लागले. एक समाज, एक भावना, एकच ध्वज, एकच राष्ट्रीय संगीत, एकच धर्म, एकच संस्कृती एकच छताखाली आणली आणि राष्ट्रीयतेची भावना उत्पन्न करुन राष्ट्रावादाच्या मार्फत युरोपात अनेक राष्ट्रे अस्तित्त्वात आणली.

१) **फेड्रीक सोरीयो :** याने The Dream of wordwide Democratic and Social Republic म्हणुन दर्शविणारे एक प्रसिध्द राष्ट्रवादाचे चित्र १८४८ ला प्रसिध्द केले. स्टेच्यु ऑफ लिबर्टी या नावाने ते संपुर्ण युरोपाचे राष्ट्रवाद दर्शविते.

२) **लुई साईन्डर :** लुई साईन्डर लिहीतात, "समान भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या समान भावना, रुढी, परंपरांनी प्रभावित झालेला समान धर्म असणाऱ्या लोकांची मानसिक एकता म्हणजे राष्ट्रवाद"[११] ही एकता फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिली. म्हणुन तिचे मुल्ये, समता, एकता, बंधुता ही युरोपात राष्ट्रवादी प्रवृत्तीमुळे वाढु लागली. आज भाषिक आणि धार्मिक तत्त्वावर अनेक राष्ट्रांची निर्मिती झालेली आपण पाहतो, ही राष्ट्रवादाची फलश्रुती आहे.

३) **प्रो.हन्स कोहन :** कोहन लिहीतात, "सर्व राष्ट्राला झिरपण्यासाठी आणि सर्वांच्या मनावर ताबा मिळवणारी मनाची स्थिती म्हणजे राष्ट्रवाद होय."[१२] जेकोबिन क्लब ही मनाची स्थितीमुळे एकत्र आला होता आणि त्याचा उद्देश राष्ट्रवादाच्या प्रचारात राष्ट्रनिर्मिती पण जे राष्ट्र सामान्य प्रजेच्या लोकशाहीवर आधारलेले पाहिजे.

४) **आल्फ्रेड गाझिया :** आल्फ्रेड गाझिया लिहीतात, "स्वदेशाबद्दलचे प्रेम आणि परकीयांबद्दल संशय या दोन्ही भावना म्हणजे राष्ट्रवाद."[१३] देशातील प्रत्येक मनुष्य जेव्हा आपल्या राष्ट्राची राष्ट्रप्रवृत्ती निर्माण करतो, तेव्हा तो दुसऱ्या राष्ट्राबद्दल आपोआपच संशयी होईल, पण राष्ट्रवादाचा जेव्हा अतिरेक होतो, तेव्हा हा संशय आपल्या राष्ट्राबद्दल होतो. उदा. अमेरिका, व्हिएतनाम युध्द. अमेरिकेतील तरुण

वर्गानेच अमेरिकेचा विरोध केला. एकंदरीत जेकोविन क्लब मार्फत संपूर्ण युरोपात राष्ट्रप्रवृत्तीला चालना देण्यासाठी खुपच मेहनत घेतली. ज्यामुळे राष्ट्रवादाला गती प्राप्त झाली.

## ८. नेपोलियन बोनापार्ट आणि नेपोलियन कोड :

नेपोलियनचा उदय हा युरोपातील खुपच मोठा अध्याय होता. सुरुवातीला आपल्या नेतृत्त्वावर फ्रेंच राज्यक्रांतीनंतर फ्रान्सला आपल्या ताब्यात घेतले आणि जो राष्ट्रवाद लोकांमध्ये फ्रेंच राज्यक्रांतीने उफाळला होता. त्याला नवीन दिशा दिली. पण पुढे हा राष्ट्रवादाचा वापर लोकांची आर्थिक पिळवणुकीने झाल्यामुळे लोकांनी पुन्हा बंड पुकारले. हा राष्ट्रवादाचा प्रकार काळानुसार कसा बदलतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

नेपोलियनने ज्या सुधारणा फ्रान्समध्ये घडवुन आणल्या, त्यामुळे राष्ट्रवादाला मोठे खतपाणी मिळाले. धर्मसंस्था म्हणुन कॅथनिक पंथाला मान्यता दिली. तो म्हणतो, "मि इजिप्त मध्ये मुसलमान आहे तर फ्रान्समध्ये कॅथालिक."[१४] शैक्षणिक सुधारणांबरोबर अनेक हक्क नेपोलियन कोडमार्फत त्याने प्रजेला दिले होते.

**नेपोलियन कोड :** १८०४ मध्ये नेपोलियनने युरोपात मानवी हक्कांची महत्त्वाची सनद जाहीर केली. ही सनदसामान्य माणसाच्या राष्ट्रवादाची फलश्रुती होती. जिच्यामुळे लोकांना त्यांचे हक्क कायदेशिरपणे मिळणार होते. या सनदेत (१) लोकशाहीचा अंत, (२) सर्व व्यापारांना समान अधिकार, (३) सर्व किसानांना स्वतंत्र केले, (४) मालमत्तेवरील अधिकार देण्यात आला, (५) व्यापारावरील मक्तेदारी बंद करण्यात आली, (६) प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष कर समाप्त केला, (७) सर्वांना समान अधिकार, (८) सामंतशाही समाप्त. या अधिकारांमुळे युरोपात राष्ट्रवादाची लहन मोठ्या प्रमाणात रुजु लागली. पण पुढे ब्रिटन, पर्शिया, रशिया आणि ऑस्ट्रेलिया यांनी १८१५ मध्ये व्हिएन्ना करार करुन या राष्ट्रानी वार्टुलुच्या युध्दात नेपोलियनचा पराभव केला.

## ९. युरोपातील राष्ट्रवादात प्रमुख लेखकांची भुमिका :-

युरोपात डेनिस डीडेरो, व्हॉल्टेअर, मॉंटेस्क्यु या लेखकांनी सामान्य माणसाची विचारांची पातळी जागृत केली. या लेखकांच्या विचारांनी युरोपात एक नवीन विचारांना अधिष्ठान दिले. लोक यांच्या लिखानाने जागृत होऊ लागले. रुसोबद्दल म्हटले जाते की, रुसो झाला नसता तर फ्रेंच राज्यक्रांती झालीच नसती, रुसोची सामुहिक ईच्छा, डिडरॉची ज्ञान- कोश जी विरांची गाथा सांगते आणि मॉंटेस्क्युची प्रसिध्द पुस्तक कायद्याचा खरा आत्मा आणि व्हॉल्टेअरची लिखानाची चौकट म्हणुन धर्मसत्तेवर प्रहार या विचारांमुळे युरोपात नवीन विचारांची लहर माजु लागली.

१) **व्हॉल्टेअर :** व्हॉल्टेअरचा जन्म २१ नोव्हेंबर १६९४ ला पॅरीस, फ्रान्स येथे झाला. पुढे त्याच्या लिखानाने संपुर्ण धर्मसत्ता हादरुन गेली. Plato's Dream, Micromegos, Zadig or Destiny, Candide of Optimism, The word as it Goes, Annals of the Empire, History of Charles XII, King of Sweeden अशा अनेक महत्त्वाचे ग्रंथ लिहुन व्हॉल्टेअरने युरोपात राष्ट्रवाद जागृत केला. धर्मसंस्थेवर प्रहार करतांना व्हॉल्टेअर लिहीतो, "चर्चमुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप होतो आणि चर्च हे पापाचे माहेरघर आहे."[१५] धर्मसत्तेने राज्यसत्तेत हस्तक्षेप केल्यामुळे लोकांची हक्काची भावना ही धुळीस मिळाली, त्याला स्वातंत्र्य नव्हते. म्हणुन व्हॉल्टेअरने युरोपात विशेषतः धर्मसंस्थेला आपल्या लिखानाच्या मध्यस्थ ठेवले.

२) **जीन जॅक रुसो :** २८ जुन १७१२ ला रुसोचा जन्म झाला. 'रुसो झाला नसता तर फ्रेंच राज्यक्रांती झाली नसती' या विधानावरुन रुसोचे महत्त्व आपल्याला युरोपाचा राष्ट्रवादात किती मुल्याचे होते, आपल्यांना कळते, रुसोने राज्यसत्ता ही सामान्य माणुस आणि सत्ताधारी वर्गाचा सर्वोच्च व्यक्तीद्वारे निर्माण होते आणि हुकूमशाही त्यात त्याज असते लोकशाही ही सर्वोच्च असते. आपल्या सामुहिक करार या ग्रंथाच्या माध्यमातुन रुसोने हा राष्ट्रवाद जाहीर केला.

३) **मॉंटेस्क्यु :** मॉंटेस्क्यु याने आपल्या विचारांच्या माध्यमातून कायद्याची चौकट फ्रान्सच्या लोकांना दिली. "१७४८ मध्ये कायद्याचा खरा आत्मा हा ग्रंथ लिहीला. त्याच ग्रंथात त्याने सत्ता विभाजनाचा सिध्दात मांडला... आज जगाचा अनेक देशांनी सत्ताविभाजनाच्या तत्त्वांचा स्विकार केला. यावरुन मॉटेस्क्युच्या विचारांचे मोठेपण दिसून येते. मॉंटेस्क्युच्या विचारांचा प्रभाव अमेरिकेवरही झाल्याचे दिसुन येते. त्याचे विचार लोकशाहीला पोषक होते."[१६] मॉंटेस्क्युच्या विचारांमुळे फ्रेंच राज्यक्रांतीला एका कायद्याची चौकट प्राप्त झाली जी सामान्य माणसाच्या हक्कांची गोष्ट करते.

४) **डेनिस डीडेरो :** डेनिस डीडेरो यांच्या विचारांचा मुख्य कोष म्हणजे १७६५ ला प्रसिध्द झालेला"ज्ञानकोश". या ज्ञानकोशात त्याने सामान्य माणसाची होणारी आर्थिक पिळवणुक यावर भर दिला आणि त्याच्या विचारांनी जनसामान्यांत जागृती घडवुन आणली. प्रो.हर्डर डिडोरोबद्दल म्हणतात, "या विचारवंतांच्या लिखाणामुळे फ्रेंच राज्यक्रांती घडुन आली नाही तर त्यांची देशातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर आपल्या लिखाणातुन प्रकाश टाकला, त्यामुळे लोकमत जागृत झाले, म्हणून क्रांती झाली."१७

**संदर्भसूची :-**


१) www.loksatta.com/photos/news/१२०६०६४/what-is-nationalism-here-is-what-tagore-emstein-etc-had-to-sa७/ Date १९/०३/२०१९, Time १२:४०.
२) Ibid, Date १९/०३/२०१९, Time १२:४१.
३) Ibid, Date १९/०३/२०१९, Time १२:४२.
४) Ibid, Date १९/०३/२०१९, Time १२:४४.
५) Ibid, Date १९/०३/२०१९, Time १२:४७.
६) aisiakshare.com/node/३४६६, Date १९/०३/२०१९, Time ०१:०४.
७) https://divyamarathi.bhaskar.com/news/EDT-Column-article-about-nationalism-५५९४९६६-NOR-html, Date १९/०३/२०१९, Time ०१:१६.
८) https://www.worldatlas.com/what-is-nationalism.html Date १९/०३/२०१९, Time ०१:३०, What is Nationalism
९) What is Nation, Ernest Reman, en.wikipedia.org/wiki/what-is-nation%३f, Date १९/०३/२०१९, Time १०:०२.
१०) Ibid, Date १९/०३/२०१९, Time १०:०३.
११) Hans Kohn, en.wikipedia.org/wiki/hans-kohn, Date १९/०३/२०१९, Time १०:१५.
१२) Ibid, Date १९/०३/२०१९, Time १०:१६.
१३) en.wikipedia.org/wiki/Alfred.frunklin (Historian), Date १९/०३/२०१९, Time १०:२२.
१४) आधुनिक जगाचा इतिहास, डॉ.कठारे अनिल, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती, २०१५, पृ.क्र. १०८.
१५) उपरोक्त, पृ.क्र. ६७.
१६) उपरोक्त, पृ.क्र. ६६.
१७) उपरोक्त, पृ.क्र. ६९.





**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विद्यार्थी, सामाजिक शास्त्रे प्रशाळा विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.


LBP PUBLICATION